

# पैंजण

किणकिणले रे किणकिणले,
राधेचे पैंजण, किणकिणले!

श्याम सावळा रे घननीळा,
वृंदावनी गोपींचा मेळा ....
परी राधेसी, तुझा लळा ;
येता न्याहळ, मन बावरले !
किणकिणले रे किणकिणले !!

वेळू वाजवी, वनी बासरी,
गुरे राखितो, सखा श्रीहरी ;
राधा होई, मनी बावरी...
गोकुळ अवघे मोहरले !
किणकिणले रे किणकिणले !!

श्यामल आभा कृष्णसख्याची,
प्रीती वेडी, या राधेची --
भक्तिभाव तो मनात धरुनि ;
तनमन अवघे तल्लीन झाले !!

किणकिणले रे किणकिणले ..
राधेचे पैंजण किणकिणले !!!

© डॉ संजीवनी केसकर पिंगळे
सातारा ९९६००४६३८९